ePaper

## राज्यात लवकरच प्लास्टिकबंदीचा निर्णय : उपमुख्यमंत्री अजित पवार



| वर्ष - 8 | अंक - 289 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | रविवार, दि. 25 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**


- ब्रूकने घेतला अविश्वसनीय कॅच!
- धावांचा पाऊस पाडला, वजन कमी केलं
- मला वेश्या असल्यासारखं वाटलं
- काळजी करू नका....राहुल गांधी


## 'वैष्णवी हगवणे प्रकरणात कोणालाही सोडलं जाणार नाही

# कडक कारवाई होणार!

## माणुसकीला काळीमा फासणारी दुर्दैवी घटना, एकनाथ शिंदे यांचा इशारा

| मुंबई / पुणे / बीड | प्रतिनिधी | महाईन्यूज

**पुण्यातून एक दुर्दैवी घटना समोर आली आहे, ती म्हणजे वैष्णवी हगवणे नावाच्या तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केली. सासरच्या छळाला कंटाळून तीने आम्हत्या केल्याचा आरोप होत आहे. या प्रकरणानं महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे. दरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यानंतर आज आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील कस्पटे कुटुंबाची भेट घेतली आहे. घडलेली घटना ही अतिशय दुर्दैवी आणि माणुसकीला काळीमा फासणारी असल्याचं यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. घडलेली घटना अतिशय दुर्दैवी असून, माणुसकीला काळीमा फासणारी आहे, या प्रकरणात कडक कारवाई केली जाईल असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. 'वैष्णवी हगवणे प्रकरणात कोणालाही सोडलं जाणार नाही, कडक कारवाई होणार', असेही एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.**





### काय म्हणाले शिंदे?

घडलेली घटना ही अतिशय दुर्दैवी आणि माणुसकीला काळीमा फासणारी आहे. पैसे मागत होते, मारहाण करत होते, या सगळ्या घटना घडत होत्या. लोकांची मानसिकता बदलायला हवी, सून म्हणजे मुलगीच असते. अतिशय दुर्दैवी फोटो आहेत. वैष्णवीच्या आई वडिलांची मानसिकता खालावली आहे.

समाज प्रगत झाला आहे, राज्यात अशा घटना घडणे वाईट आहे. अमानवी घटना आहे. नऊ महिन्याचं बाळ समोर असातना मुलगी असं करू शकत नाही. या सर्व प्रकरणावर मुख्यमंत्री लक्ष ठेवून आहेत, पोलीस काम करत आहेत. घटनेला जबाबदार असणाऱ्या कोणालाही पाठीशी घालू नये. कुटुंबाची भावना लक्षात घेऊन राज्य सरकार कडक कारवाई करेल, अशा कोणत्याही घटनात राजकारण होता कामा नये, परिस्थिती बदलायला हवी, अशा घटना घडू नये म्हणून कारवाई अपेक्षित आहे, कठोर कारवाई केली जाईल, मुख्यमंत्री लक्ष ठेवून आहेत, उच्चस्तरीय चौकशी सुरू आहे, यामध्ये कोणीही असेल त्याला गृहविभाग सोडणार नाही, कोणालाही पाठिशी घातलं जाणार नाही, असं यावेळी एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

दरम्यान या प्रकरणात पोलिसांनी आज मोठी कारवाई केली आहे, वैष्णवीचं स्त्रीधन जप्त करण्यात आलं आहे, तसेच तिचा पती आणि तिचा दीर यांच्याकडे असलेलं परवानाधारक पिस्तूल देखील जप्त करण्यात आलं आहे, तसेच तिच्या सासऱ्यानं पळून जाण्यासाठी जी कार वापरली होती ती देखील जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणात आज वैष्णीचे दोन्ही भाऊ आणि तिच्या एका मैत्रिणीचा जबाब नोंदवण्यात आला आहे.

### नेमकं काय आहे प्रकरण?

16 मे रोजी वैष्णवी हगवणे नावाच्या तरुणीने पुण्यात गळफास घेऊन आत्महत्या केली होती. सासरच्या छळाला कंटाळून तिने आत्महत्या केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात पोलिसांनी वैष्णवीचा पती, तिचा दीर, तिचा सासरा आणि सासू तसेच नणंद यांना अटक केली आहे.

वैष्णवीच्या अंगावर मारहाणीच्या खुणा देखील आढळून आल्याची माहिती समोर येत आहे. वैष्णवीच्या आत्महत्या प्रकरणानं राज्यभरात खळबळ उडाली आहे. वैष्णवीचा सासरा राजेंद्र हगवणे हा राष्ट्रवादीचा पदाधिकारी होता, मात्र हे प्रकरण समोर आल्यानंतर त्याची पक्षातून हाकालपट्टी करण्यात आली आहे.

दरम्यान तिच्या सासऱ्या संदर्भात आणखी एक धक्कादायक माहिती समोर आली आहे, ती म्हणजे 16 मे रोजी वैष्णवीने आत्महत्या केली, त्यानंतर 17 मे रोजी तो तिचा मृतदेह पाहाण्यासाठी रुग्णालयात आपल्या 20 ते 25 कार्यकर्त्यांसह गेला होता. मात्र गुन्हा दाखल होणार असल्याची कुणकुण लागताच तो फरार झाला, त्यानंतर पोलिसांनी सापळा रचून त्याला अटक केली.

### वैष्णवी हगवणे प्रकरणात पोलिसांची मोठी कारवाई

वैष्णवी हगवणे या तरुणीनं 16 मे रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली, तीने सासरच्या छळाला कंटाळून आत्महत्या केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात पोलिसांनी वैष्णवीचा पती, दीर, सासरा, सासू आणि नणंद यांना अटक केली आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी वैष्णवीचा पती, तिची सासू आणि नणंद यांना अटक केली होती. तर तिचा सासरा राजेंद्र हगवणे आणि दीर फरार होते. अखेर पोलिसांनी सापळा रचून त्यांना देखील अटक केली. या प्रकरणात आता मोठी अपडेट समोर आली आहे. ती म्हणजे पोलिसांनी वैष्णवीचा पती शशांक हागवणे आणि तिचा दीर सुशील हगवणे यांच्याकडे असलेलं परवानाधारक पिस्तूल पोलिसांनी जप्त केलं आहे. तसेच राजेंद्र हगवणे याने पळून जाण्यासाठी जे वाहन वापरले होते, ते देखील पोलिसांनी जप्त केलं आहे. वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणात पोलिसांनी आज वैष्णवीचे दोन्ही भाऊ विराज आणि पृथ्वीराज तसेच तिची एक मैत्रीण अशा एकूण तीन साक्षीदारांचे जबाब नोंदवले आहेत. पोलिसांनी वैष्णवीला स्त्रीधन म्हणून देण्यात आलेले चांदीची भांडी देखील जप्त केली आहेत. त्यामध्ये पाच ताटं ,पाच तांबे ,चार वाट्या, एक करंडा आणि अधिक महिन्यात देण्यात आलेल्या एका चांदीच्या ताटाचा समावेश आहे.

# माणुसकीला काळीमा फासणारी घटना!

## दोषींवर कठोर कारवाई;उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण अतिशय निंदनीय आणि दुर्दैवी आहे. ही माणुसकीला काळिमा फासणारी घटना आहे. या प्रकरणाचा सखोल तपास होईल. जे यामध्ये दोषी असतील त्या सर्वांवर कारवाई होईल,' अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी दिली.**



'वैष्णवी यांच्याबाबत झालेली घटना मनाला दुःख देणारी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. दोषींवर कठोर कारवाई होईल,' असेही शिंदे यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले.शिंदे यांनी शनिवारी वाकड येथे वैष्णवीच्या कुटुंबीयांची भेट घेतली. विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, खासदार श्रीरंग बारणे या वेळी उपस्थित होते. शिंदे म्हणाले, 'ही घटना अतिशय दुर्दैवी आहे. पैशांसाठी वैष्णवी यांना मारहाण झाली. सून आपल्या मुलीप्रमाणे असते. तिच्याकडे लाडकी सून म्हणून लोकांनी पाहिले पाहिजे. लोकांच्या मानसिकतेत बदल झाला पाहिजे. पुरोगामी महाराष्ट्रात अशा प्रकारची घटना घडणे दुर्दैवी आहे.''पोलीस तपास करीत आहेत. जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल. कोणताही मोठा अधिकारी असला आणि तो दोषी असेल तर कारवाई केली जाईल. कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. कस्पटे कुटुंबीयांना न्याय दिला जाईल,' असेही शिंदे यांनी स्पष्ट केले. महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी होत असल्याबाबत विचारले असता ते म्हणाले,'अशा घटनांमध्ये कोणीही राजकारण आणू नये. याकडे राजकीय दृष्टिकोनातून पाहू नये. लोकांची मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे. तपासात कोणत्याही त्रुटी राहणार नाहीत, याची सरकार काळजी घेत आहे.'दरम्यान, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनीही कस्पटे कुटुंबीयांची भेट घेतली.ज्येष्ठ शास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांत्वन केले. 'अत्यंत सोप्या भाषेत खगोलशास्त्र सामान्य माणसांमध्ये पोहोचवण्याचे काम नारळीकर यांनी केले. खऱ्या अर्थाने ते देशाचे भूषण होते. त्यांची ऊर्जा प्रत्येक पिढीला मिळाली पाहिजे. राज्य सरकार म्हणून त्यांच्या नावाला साजेसे जे करता येईल, ते केले जाईल,' असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.या घटनेनंतर सासरा राजेंद्र हगवणे आणि दीर सुशील हगवणे हे पळून गेले होते. तर पती शशांक सासू आणि नणंद यांना अटक करण्यात आली होती. पोलिसांच्या पुणे जिल्ह्यातील अनेक भागात टीम रवाना केल्या होत्या. त्याच दरम्यान काल पहाटेच्या सुमारास सासरे रविंद्र हगवणे आणि दीर सुशील हगवणे या दोघांना स्वारगेट येथून ताब्यात घेतले.

### नारळीकर कुटुंबीयांची भेट

दोघांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.वैष्णवी हगवणे यांनी आत्महत्या केल्याच्या घटनेनंतर त्यांचे ९ महिन्यांचे बाळ हगवणे कुटुंबियांच्या घरी आढळून आले नाही. हे बाळ कुठे गेले आणि कोणाकडे असेल याचा शोध पोलीस आणि वैष्णवी हगवणे यांचे कुटुंबिय घेऊन लागले. त्याच दरम्यान वैष्णवी यांचे पती शशांक हगवणे यांचे मित्र निलेश चव्हाण यांच्याकडे माहीती मिळाली. त्यानंतर वैष्णवी यांचे कुटुंबिय निलेश चव्हाण यांच्याकडे बाळ मागण्यांसाठी गेले. त्यावेळी निलेश चव्हाण याने बंदुकीचा धाक दाखवून बाळ देण्यास नकार दिला. त्यानंतर या प्रकरणी बंदुकीचा धाक दाखविल्या प्रकरणी निलेश चव्हाण याच्यावर वारजे पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# हगवणे कुटुंबीयांकडून थोरल्या सुनेचाही छळ

## महिला आयोगाला दिलेल्या पत्रातून माहिती उघड

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वैष्णवी हगवणे यांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी अटकेत असलेले राजेंद्र हगवणे आणि कुटुंबाने थोरली सून मयूरी जगताप-हगवणे यांनाही मोटार आणि पैशांसाठी मारहाण केल्याचा आरोप आहे. राजकीय पाठिंब्याचा आणि मेव्हणा पोलीस अधिकारी असल्याचा धाक दाखवून गैरवर्तन करून अपंग भाऊ आणि आईला जिवे मारण्याची धमकी दिली, असे राज्य महिला आयोगाकडे दिलेल्या तक्रारीवरून उघडकीस आले आहे.**





मयुरी यांची आई लता आणि भाऊ मेघराज जगताप यांनी ६ नोव्हेंबर २०२४ रोजी राज्य महिला आयोगाकडे तक्रार दिली होती. मयुरी यांचे २० मे २०२२ रोजी सुशील राजेंद्र हगवणे याच्याशी लग्न झाले. लग्नाच्या काही दिवसांनंतर सासरे राजेंद्र हगवणे यांनी मोटार, पैशांची मागणी करण्यास सुरुवात केली. त्यावरून ते त्रास देऊ लागले. राजेंद्र, सासू लता, दीर शशांक, नणंद करिष्मा हे मयुरी यांना मारहाण करत. भावाला आणि आईला मारून टाकू, अशी धमकी देत, असे या तक्रारीत म्हटले आहे. वाद झाल्यानंतर सामंजस्यातून तो मिटविला जात होता. १८ फेब्रुवारी २०२४ रोजी पौड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. मात्र, पोलीस अधिकाऱ्यांनी समज देऊन मध्यस्थी केली. सासू, सासरे मयुरी यांना सोडण्याची तिच्या पतीकडे मागणी करीत होते. त्याचा राग मयुरीवर काढला जात होता. ६ नोव्हेंबर २०२४ रोजी पती घरात नसताना सासू, सासरा, दीर, नणंद यांनी मयुरी यांना मारहाण केली. सासरा आणि दिराने त्यांच्याशी गैरवर्तन केले.

मुलगा होत नसल्याचे म्हणत शिवीगाळ केली. मयुरी मोबाइलमध्ये चित्रीकरण करीत असल्याचे लक्षात येताच दीर शशांकने मोबाइल हिसकावून पळ काढला. मयुरी यांनी त्याचा पाठलाग केला. हा सर्व प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चित्रित झाला आहे. पोलिसांत तक्रार दाखल करू शकत नसल्याचा फायदा घेऊन सासू, नणंदे मयुरी यांच्याच विरोधात पोलिसांत तक्रार दिली, असे राज्य महिला आयोगाकडे दिलेल्या तक्रारीत स्पष्ट करण्यात आले आहे.आमच्याकडे एकाच दिवशी दोन तक्रारी ई-मेलद्वारे दाखल झाल्या. सुरुवातीला ६ नोव्हेंबर २०२४ रोजी मयुरी यांचे बंधू मेघराज जगताप यांनी तक्रार केली. त्यानंतर रात्री १२ वाजता मयुरी यांची नणंद करिष्मा हगवणे हिची मेलवरून तक्रार आली. एकाच दिवशी दोन तक्रारी आल्यानंतर बावधन पोलिसांकडे या तक्रारी पाठवल्या आणि कारवाईच्या सूचना दिल्या. एकाच कुटुंबातील वादातून परस्परविरोधी तक्रारी आल्या होत्या. कौटुंबिक वाद पोलिसांच्या भरोसा सेलमध्ये समुपदेशनाद्वारे मिटविण्यात यावा, यासाठी प्रयत्न करण्यात आले. नियमानुसार तीन वेळा समुपदेशन करणे गरजेचे असते. त्यानुसार प्रक्रिया पार पाडण्यात आली.

### 'एकाच दिवशी परस्परविरोधी तक्रारी'

या प्रकरणात लवकरच आरोपपत्र दाखल करण्यात येणार आहे,' असे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी सांगितले.मयुरी यांची आई लता आणि भाऊ मेघराज जगताप यांनी ६ नोव्हेंबर २०२४ रोजी राज्य महिला आयोगाकडे तक्रार दिली होती. मयुरी यांचे २० मे २०२२ रोजी सुशील राजेंद्र हगवणे याच्याशी लग्न झाले.

## पिंपरी महापालिकेच्या नवीन सुधारित विकास आराखड्यात रिंग रोडची मार्गीका

# रिंगरोडमुळे वादाची ठिणगी!

## हजारो बांधकामे बाधित होणार; लोकप्रतिनिधींच्या भूमिकेकडे लक्ष

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सुट्ट्यांचा हंगाम सुरु झाला की, नागरिकांना मूळ गावी जाण्याचे किंवा नातेवाईकांना भेटण्यासाठी अथवा पर्यटनाला जाण्याचे वेध लागतात. ह्या काळात रेल्वेला असलेली गर्दी, प्रतीक्षा यादी बघता सामान्य नागरिक हा खासगी प्रवासी बसद्वारे प्रवासाला प्राधान्य देतो. मात्र ,नेमकी प्रवाश्यांची ही गरज ओळखून खासगी बस मालकांनी प्रचंड भाडेवाढ केली आहे. यातून ग्राहकांची पिळवणूक आणि लूटमार सुरू आहे.**



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने राबविण्यात येणारा एचसीएमटीआर मार्गाचा (रिंगरोड) प्रकल्प अनेक वर्षांपासून रखडला आहे. महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या नवीन सुधारित विकास आराखड्यात रिंगरोडची मार्गिका दर्शविण्यात आली आहे. त्यामुळे शहरांत अंतर्गत रिंगरोड बनविला जाणार असल्याचे स्पष्ट होत आहे. या मार्गात येणारी हजारो बांधकामे बाधित होणार असल्याने त्या प्रकल्पावरून पुन्हा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे

उद्योगनगरीचा विकास होत असताना गरिबांना घरकुल उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची स्थापना १४ मार्च १९७२ ला झाली. दहा गावांचे मिळून प्राधिकरण स्थापन निर्माण झाले होते. त्यानुसार ४४ पेठा (सेक्टर) विकसित करण्याचे धोरण प्राधिकरणाने ठेवले होते. मात्र, प्रत्यक्षात पन्नासवर्षांत निम्म्याहून अधिक सेक्टर विकसित झालेले नाहीत.

काळेवाडी, थेरगाव, वाकड, चिंचवड, वाल्हेकरवाडी, चिखली, मोशी परिसरातील अनेक सेक्टरमध्ये भूसंपादन झालेले नाही. जागा ताब्यात आल्या नव्हत्या. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ११२ (२) अन्वये गठीत पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण कलम १६० (१) नुसार मे २०२१ मध्ये विसर्जित करण्यास मान्यता दिली आहे.

सेक्टर क्रमांक ५ व ८ पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र, सेक्टर क्रमांक ९, ११, १२ आणि भोसरी मध्यवर्ती सुविधा केंद्रमधील उपलब्ध एकसंघ २२३ हेक्टर क्षेत्राकरिता (पुणे महानगरप्रदेश विकास प्राधिकरणाकडे पीएमआरडीए) देण्यास मान्यता दिली होती.

महापालिकेच्या विकास आराखड्यात रिंगरोडची मार्गिका दर्शविण्यात आली आहे. रिंगरोडच्या विरोधात चिंचवडेनगर, वाल्हेकरवाडी, काळेवाडी परिसरात मोठे जन आंदोलन उभे राहिले होते. असे असताना नवीन आराखड्यामध्ये काही जुनी आरक्षणे कायम राहिली आहेत. आकुर्डीतून निघणारा रिंगरोड, चिंचवडेनगर, थेरगाव परिसरातून काळेवाडीकडे कायम ठेवला आहे. प्रस्तावित रिंगरोडच्या मार्गिकेवर हजारो बांधकामे झाली आहेत. रिंगरोडचा निर्णय झाल्यास पुन्हा वाद निर्माण होऊन आंदोलन पेटण्याची शक्यता आहे. त्या प्रकल्पाबाबत बाधित नागरिक, लोकप्रतिनिधी कोणता निर्णय घेतात, याकडे लक्ष लागले आहे.

> “ रिंग रोडसंदर्भात नव्याने आलयमेन्ट करून या संदर्भातील प्रस्ताव महापालिकेच्या सर्वसाधारण सभेने केला आहे. नवीन आराखड्यात रिंग रोडचे आरक्षण दिसत असले तरी, या भागात सध्या अनेक गोरगरिबांची बांधकामे झाली आहेत. नवीन अलायमेन्ट सुचविल्याने जुन्या आरक्षणाची आवश्यकता नाही. प्रस्तावित आराखड्यात आरक्षण दिसत आहे. त्याला आम्ही हरकत घेणार आहोत. तसेच या प्रकल्पाविरोधात पुन्हा मोठे जनआंदोलन उभारण्यात येईल.
>
> **- नामदेव ढाके,** माजी सत्तारुढ पक्षनेते

> “ विकास आराखड्यात आरक्षण असेल तर त्यावर हरकती घेण्यासाठी वेळ देण्यात आला आहे. त्याबाबत नागरिक हरकती व सूचना कळवू शकतात. त्याचा विचार प्रशासनाच्या वतीने करण्यात येईल.
>
> **-प्रसाद गायकवाड,** उपसंचालक, नगररचना विभाग

---

## एक कार, दोन पिस्तूल आणि लग्नात दिलेली चांदीची भांडी जप्त

## वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणात पिंपरी-चिंचवड पोलिसांची कारवाई

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वैष्णवी हगवणे प्रकरणात पिंपरी-चिंचवड पोलिसांकडून तपासाला वेग आला आहे. पोलिसांनी शनिवारी एक कार, दोन पिस्तूल आणि लग्नात दिलेली चांदीची भांडी देखील पोलिसांनी जप्त केली आहेत.**




वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणी बावधन पोलिसांनी आतापर्यंत पाच संशयितांना अटक केली आहे. तसेच वैष्णवीचा पती शशांक हगवणे आणि सुशील हगवणे यांच्याकडे पिस्तूल असल्याची माहिती समोर आली. पोलिसांनी शशांक आणि सुशील यांच्याकडील दोन पिस्तूल जप्त केले. पुणे शहर पोलिसांकडून या दोघांना पिस्तूल परवाना देण्यात आला होता. त्यामुळे पुणे शहर पोलिसांकडून या दोघांच्या पिस्तूल परवाना जप्तीची नोटीस बजावण्यात आली. दरम्यान, बावधन पोलिसांनी याप्रकरणी १७ मे राजी गुन्हा दाखल करून वैष्णवी हिचा पती शशांक, सासू लता आणि नणंद करिष्मा यांना अटक केली होती. मात्र, सासरा राजेंद्र आणि दीर सुशील हे दोघेही फरार होते. पोलिसांची सहा पथके त्यांच्या मागावर होती. अखेर बावधन पोलिसांनी शुक्रवारी (दि. २३ मे) पुणे शहरातून राजेंद्र आणि सुशील या पितापुत्राला अटक केली. त्यांनी पळून जाण्यासाठी वापरलेल्या वाहनांचा पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे. यात पोलिसांनी शुक्रवारपर्यंत दोन कार, एक दुचाकी अशी तीन वाहने जप्त केली होती. त्यापाठोपाठ शनिवारी देखील एक कार, चांदीची भांडी, दोन पिस्तूल जप्त केले आहेत.

### नीलेश चव्हाणच्या मागावर तीन पथके

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणात सहआरोपी करण्यात आलेला नीलेश चव्हाण हा फरार आहे. पिंपरी-चिंचवड पोलिसांची तीन पथके त्याच्या मागावर असून लवकरच त्याला अटक करण्यात येईल, असे पोलिस उपायुक्त विशाल गायकवाड यांनी सांगितले.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने »



### नाम प्राणाबरोबर सांभाळावे.

आपल्याला जिव्हा दिली आहे ती जर नामस्मरण करण्याव्यतिरिक्त वापरली तर ते चांगले होईल का ? जे करण्याने देवाची प्राप्ती होते, ते न करता इतर गोष्टी बोलून वेळ घालविला तर कसे चालेल ? तुम्ही अभ्यास करता; अभ्यासाकरिता जी पुस्तके घेतली ती जर नुसती उशाला घेऊ लागलात तर अभ्यास होईल का ? म्हणून म्हणतो, आपल्याला जिव्हा दिली आहे, तिचा उपयोग नामस्मरण करण्याकरिता करा. प्रकृती चांगली सुदृढ आहे; चांगले धट्टेकट्टे पाय आहेत; ते जर देवाच्या प्राप्तीकरिता वापरले नाहीत, तर पाय नसलेले काय वाईट ? तुमच्यापुढे ब्रह्मानंदबुवांचे प्रत्यक्ष उदाहरण असून असे का करता ? त्यांनी काय केले पाहा ! त्यांनी नामस्मरणाशिवाय दुसरे काहीच केले नाही. त्यांनी प्राणाबरोबर नाम सांभाळले. तुम्हाला तितके जरी करता आले नाही तरी, जसे देहावर प्रेम करता तसे तरी नामावर ठेवा. आताच्या दिवसांत तर कलीचा एक एक दिवस देवावरचा भाव घालवायला कारण होतो; तरी ह्या वेळेस सांभाळा. अश्रद्धा उत्पन्न झाली तर आपले पापच आड येते असे समजा; आणि त्या वेळेस नामस्मरण करीत जा. माझ्यावर व्यवहाराबाबत पाहिजे तर विश्वास ठेवू नका, पण नामस्मरण करायला सांगतो त्यावर विश्वास ठेवा. नाम व्यवहाराकरिता उपयोगात आणू नका. नामस्मरण नामाकरताच करीत जा; म्हणजेच खरा आनंद तुम्हाला मिळेल. दिवसातून किती वेळ नामांत घालविला त्याचा रोज विचार करीत जा, आणि काही वेळ तरी नामात घालविण्याचा निश्चय करा; म्हणजे विश्वास वाढत जाईल. खरे समाधान तुम्हाला नामातच मिळेल. भगवंताचे नाम हे स्वयंभू आणि स्वाभाविक आहे. नामाबद्दल संशय किंवा विकल्प आले तरी ते तसेच आग्रहाने घ्यावे. सर्व संशय आपोआप नाहीसे होतील. खरोखर, भगवंताचे नाम हे बँकेत ठेवलेल्या पैशाप्रमाणे आहे. वेळप्रसंगी ते खास उपयोगी पडते. विकल्पांच्या उच्चाटनाची गुरुकिल्ली म्हणजे नाम होय. भगवंताला अनन्य शरण जाऊन ‘ तुझ्या नामाचे प्रेम मला दे ’ अशी काकुळतीने त्याची प्रार्थना करावी, म्हणजे नामाचे प्रेम आपोआप वाढेल आणि भगवंताचे खरे दर्शन घडेल. वासनेमुळे माझ्या आनंदाचा भंग होतो; म्हणजे वासना माझ्या आनंदाची चोरीच करते. ज्या समाधानाकरता माझी खटपट चाललेली असते, ते समाधानच वासना हिरावून नेते. नामस्मरणाने या वासनेला योग्य दिशा मिळते. म्हणून, सदासर्वकाळ नामात राहिले, तर हळूहळू तिचा अंत होऊन केवळ आनंदच आपल्याजवळ राहील.

बोधवचन:- आपण आपल्या जिभेला नामाचा चाळाच लावून घ्यावा.

# दोन्हीही युद्धांमध्ये विजय महत्त्वाचा... रणभूमीवर आणि ‘माहिती युद्धा’तही !



**‘स्टेट’मेंट**

**अधिकराव दिवे-पाटील**
संस्थापक, संपादक

**पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर ‘ऑपरेशन सिंदूर’ हाती घे ऊन भारतीय जवानांनी अचूक कामगिरी केली. प्रत्यक्ष युद्धभूमीवरील युद्धात भारताने पाकड्यांना घरात घुसून मारले, हे पाक आणि त्यांची मित्रराष्ट्रेही मान्य करतात. पण हल्ली दुसरी लढाई देखील लढावी लागते, ती म्हणजे जगापुढे माहिती आणि पुरावे मांडण्याची..थोडक्यात मीडियाची ! आणि त्यातही भारताने पाकड्यांना चारी मुंड्या चीत केले आहे, हे आता वेगळे सांगायला नको !**



### अड्डे उद्‌ध्वस्त करण्याचे मुख्य उद्दिष्ट !

पाकड्यांच्या आशीर्वादाने चाललेले आणि त्यांच्या लष्कराने आश्रय दिलेले दहशतवाद्यांचे नऊ अड्डे उद्‌ध्वस्त करून भारताचे मुख्य उद्दिष्ट साध्य झाले आहे. त्यानंतर पाकिस्तानची मस्ती सुरूच होती आणि त्यांच्या हवाईतळांवर आणि लष्करी व्यवस्थापनांवर करण्यात आलेले क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले हे त्यांच्या मस्तीच्या प्रयत्नांना दिलेले प्रत्युत्तर होते. त्यात पाकिस्तानची अपरिमित हानी झाली, हे सर्वांनी मान्य केले ! एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी, की कारवाईच्या त्या चार दिवसांचा पाकिस्तानला आलेला खर्च भारताच्या तुलनेत जवळजवळ सोळा पट आहे. त्यांचे किती नुकसान झाले त्याचा विचार केलेला बरा !

### भारताचे यश न बघवणारी राष्ट्रे..

भारताला मिळालेले हे एकतर्फी यश अनेक राष्ट्रांना सहन झाले नाही. पाक, त्यांचे मित्र आणि त्यांना कायम खतपाणी घालणारी पाश्चिमात्य माध्यमे मात्र भारताचे हे यश सतत झाकोळून टाकायचा प्रयत्न करत राहिली. हे सर्वजण एकत्र येऊन एकसंधपणे आणि नियोजित पद्धतीने भारताच्या विरोधात माहिती युद्ध राबवत होते आणि पडद्यामागे दुसरे युद्ध लढत होते.

### सरतेशेवटी भारतच वरचढ..पण

या कारवाईमध्ये प्रत्यक्षात भारत वरचढ ठरला असला तरी त्याच्या खोट्या आणि दिशाभूल करणाऱ्या बातम्यांनी, विश्लेषणांनी आणि रिपोर्टनी पाकच्या फाटक्या झोळीत न मिळालेल्या विजयाचे श्रेय टाकले. परिणामी, प्रत्यक्ष अवकाशात विजय मिळवूनही भारताला आर्थिक, जागतिक नुकसान सहन करायला लागू शकते. त्यामुळे, यापुढे संघर्ष करण्याची वेळ आली, तर लष्करी यशा बरोबर माहिती युद्धातही तितक्याच सामर्थ्याने उतरण्याची गरज निर्माण झाली आहे. प्रत्यक्ष रणभूमीवरील संघर्षाइतकीच जागतिक जनमताची लढाईही निर्णायक ठरते, हे एव्हाना भारतीय सत्ताधाऱ्यांनाही समजून चुकले असणार !

### जागतिक माध्यमांवर मोर्चेबांधणी..

एकीकडे आपली माध्यमे आणि सर्व पत्रकार पहलगाम येथील हल्ल्याचे विश्लेषण करत होते, प्रतिसादाची रणनीती ठरवत होते, तोपर्यंत पाकिस्तानने जागतिक माध्यमांवर आपली मोर्चेबांधणी सुरू केली होती. पहलगाम हल्ल्यानंतर अवघ्या ४८ तासांत पाकिस्तानचे मंत्री इशाक डार, ख्वाजा आसिफ, अत्ताउल्ला तारार आणि ‘पीपल्स पार्टी’ चे प्रमुख बिलावल भुट्टो, बीबीसी, सीएनएन, अल् जझीरा सारख्या आंतरराष्ट्रीय माध्यमांवर २५ पेक्षा जास्त नेते, त्यांचे पत्रकार मुलाखती देत होते. या सर्व मुलाखतींमध्ये एक गोष्ट सातत्याने मांडली जात होती, की या हिंसाचाराचे मूळ कारण काश्मीर आहे, दहशतवाद नाही. आणि मुख्य म्हणजे ही फक्त प्रतिक्रिया नव्हती, तर पूर्वनियोजित प्रोपगंडा मोहीम होती. हल्लेखोर कोण? याऐवजी हल्ला का झाला? याला मुख्य प्रश्न करून त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताच्या भूमिकेवरच संशय निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आत्ता एक गोष्ट लक्षात येते की काही प्रमाणात ते यशस्वी देखील झाले आहेत.

### ‘फेक नॅरेटिव्ह’ वेगाने पसरतो !

आठवा तो, सात मे चा दिवस.. भारताने अखेर ‘ऑपरेशन सिंदूर’ सुरू केले आणि पाक तसेच पाकव्याप्त काश्मीर मध्ये घुसून दहशतवादी अड्डे उद्‌ध्वस्त केल्याचे स्पष्ट आणि ठोस पुरावे सादर केले. तरीही प्रसारमाध्यमांनी पाकिस्तानला दहशतवाद पोसणारा देश म्हणून नव्हे, तर भारताच्या आक्रमकतेचा बळी म्हणून प्रोजेक्ट केले.. जगाला नेमके काय समजले ? भारतीय हवाई दलाने हल्ला सुरू केल्यानंतर अर्ध्या तासातच, पाकिस्तानी लष्करी जनसंपर्क विभागाने ट्विटरवरून दावा केला की त्यांनी भारताची पाच राफेल लढाऊ विमाने पाडली आहेत. आणि त्याला पुष्टी देण्यासाठी २०२१ मध्ये झालेल्या मिग-२१ अपघातातील जुने फोटो प्रसिद्ध करण्यात आले. परंतु या दाव्यांमागील तांत्रिक तथ्ये महत्त्वाची नव्हती, महत्त्वाचा होता अशा ‘फेक नॅरेटिव्ह’ चा पसरण्याचा वेग !

### ‘एआय’ तंत्रज्ञानाचा वापर..

पाकने आपल्या आणि जगातील लोकांची दिशाभूल करण्यासाठी ‘एआय’ तंत्रज्ञानाच्या सहाय्याने तयार केलेल्या बनावट फोटोंमधून , पाकव्याप्त काश्मीरमध्ये कथित नागरिकांचा मृत्यू झाल्याचे चित्र रंगवले. त्यातून निर्माण झालेले भावनिक आंदोलन इतके तीव्र होते, की खोटे फोटो असल्याचे पुढे उघड झाले, तरीही त्याचा परिणाम आधीच झाला होता कारण मानवी मेंदू भावनिक संदेश लवकर स्वीकारतो, हे जगाला माहीत आहेच!

### आंतरराष्ट्रीय ‘थिंक टँक’ चा वापर

‘आर यु एस आय’ सारख्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या थिंक टँकद्वारे आयोजित वेबिनारमध्ये ब्रिटन आणि अमेरिकेतील निवृत्त लष्करीअधिकाऱ्यांकडून पाकच्या दाव्यांना पाठिंबा मिळवला गेला. हे अचानक घडलेले नाही. या निवृत्त अधिकाऱ्यांशी संपर्क ठेवणे, त्यांना आपल्याकडे वळवणे, आणि योग्य क्षणी त्यांच्याकडून हवे ते मतप्रदर्शन करून घेणे, हा त्यांच्या ‘माहिती युद्धनीती’ चा एक भाग होता, त्याची तयारी बरीच आधी सुरू झाली होती.

### पाकड्यांनी उभी केली सायबर फौज..

पाकने सुमारे १२ हजारहून अधिक ‘बॉट खात्यां’ ची सायबर फौज उभी करून ‘इंडियालाईज’ सारखे हॅशटॅग जगभरात ट्रेंडमध्ये आणले. केवळ ७२ तासांतच या हॅशटॅग २.३ मिलियन यूजरनी वापरला, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर बनावट पण सजीव आणि नैसर्गिक वाटणारे जनमत तयार करण्यात आले. हे हॅशटॅग्स आणि मेसेज इतक्या सफाईदारपणे पसरवले गेले, की हा प्रोपोगंडा नसून सामान्य लोकांचे मत आहे, असा भास निर्माण केला गेला. त्यातही मोठ्या प्रमाणात पाकने बाजी मारली.

### संघर्षाचे स्वरूपच बदलले..

‘ऑपरेशन सिंदूर’ हे लढ्याच्या दृष्टिकोनातून एक निर्णायक पाऊल ठरले असले, तरी त्याचबरोबर संघर्षाचे स्वरूप किती बदलले आहे, याची जाणीवही करून देणारे आहे. बंदुका, मिसाईल आणि ड्रोन बरोबरीने परिणामकारक शब्द आणि तातडीचा प्रचार आणि प्रसार हा तितकाच महत्त्वाचा झाला आहे. भारताने या वास्तवाला ओळखून आतापर्यंत ‘माहिती युद्धा’ चे नवे नियम लिहायला सुरुवात केलीही असेल, कारण लढाई यापुढे फक्त सीमेवर नाही, जागतिक नागरिकांच्या मनावर लढवली जाईल. एखादा लढा प्रत्यक्ष जिंकणे, कारवाईमध्ये बाजी मारणे, हे महत्त्वाचे असले तरी यापुढे ‘माहिती युद्धा’ मध्येही भारताला वरचढ व्हायचे आहे, हे लक्षात घेऊन यापुढे व्यूहरचना करायला हवी, त्यातच आपले भले आहे !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.


# छगन भुजबळ तिसरे उपमुख्यमंत्री होतील!

## गिरीश महाजन यांनी भुजबळ यांना लगावला खोचक टोला

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते तथा मंत्री छगन भुजबळ यांनी महायुती सरकारमध्ये नुकतीच मंत्रिपदाची शपथ घेतली आहे. मात्र, विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात पुन्हा महायुतीचं सरकार सत्तेत आल्यानंतर पहिल्याच मंत्रिमंडळातून छगन भुजबळ यांना डावलण्यात आलं होतं. त्यामुळे छगन भुजबळ हे चांगलेच नाराज झाले होते. त्यानंतर भुजबळांनी अनेकदा अजित पवारांवर टीका देखील केली होती. एवढंच नाही तर जहां नहीं चैना, वहां नहीं रहना असं म्हणत भुजबळांनी सूचक इशाराही दिला होता.**





त्यानंतर छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट देखील घेतली होती. मात्र, यानंतर अखेर छगन भुजबळ यांचा मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला. त्यामुळे त्यांची नाराजी दूर झाल्याचं बोललं आता जात आहे. यानंतर आता छगन भुजबळ हे नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदावर दावा करणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. या पार्श्वभूमीवर भाजपाचे नेते तथा मंत्री गिरीश महाजन यांना माध्यमांच्या प्रतिनिधींनी प्रश्न विचारला असता मंत्री गिरीश महाजन यांनी एक मोठं विधान केलं आहे.'देवेंद्र फडणवीस यांनी ठरवलं तर छगन भुजबळ पालकमंत्री काय तिसरे उपमुख्यमंत्री देखील होतील',

असं म्हणत गिरीश महाजन यांनी छगन भुजबळ यांना खोचक टोला लगावला आहे. दरम्यान, गिरीश महाजन यांनी छगन भुजबळ यांच्यावर खोचक टीका केली असली तरी त्यांच्या या विधानाची राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली आहे. छगन भुजबळ यांनी मंत्रिपदाची शपथ घेतल्याच्या पार्श्वभूमीवर माध्यमांच्या प्रतिनिधींनी गिरीश महाजन यांना प्रश्न विचारला. यावर बोलताना गिरीश महाजन म्हणाले की, "बरोबर आहे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशिवाय ते शक्य होणार नाही", असं महाजन यांनी म्हटलं.तसेच छगन भुजबळ मंत्री झाले आहेत, आता ते नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदावर दावा करणार असल्याची चर्चा आहे असं विचारलं असता यावर गिरीश महाजन म्हणाले की,"चांगलं आहे, दावा करणं काय वाईट आहे? देवेंद्र फडणवीस यांनी ठरवलं तर काही होऊ शकतं. ते (छगन भुजबळ) आणखी तिसरे उपमुख्यमंत्री देखील होऊ शकतात.

हे सर्व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हातात आहे. कोणाला पालकमंत्री करायचं? कोणाला उपमुख्यमंत्री करायचं? कोणाला मंत्री करायचं? हे सर्व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हातात आहे", असं गिरीश महाजन यांनी म्हटलं आहे. दरम्यान, ते पुढे असंही म्हणाले की असं कोणीही काही म्हटलेलं नाही. पण तुम्ही असं तेल टाकू नका, असंही गिरीश महाजन यांनी मिश्किलपणे म्हटलं. छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट देखील घेतली होती. मात्र, यानंतर अखेर छगन भुजबळ यांचा मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला. त्यामुळे त्यांची नाराजी दूर झाल्याचं बोललं आता जात आहे. यानंतर आता छगन भुजबळ हे नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदावर दावा करणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. या पार्श्वभूमीवर भाजपाचे नेते तथा मंत्री गिरीश महाजन यांना माध्यमांच्या प्रतिनिधींनी प्रश्न विचारला असता मंत्री गिरीश महाजन यांनी एक मोठं विधान केलं आहे.

'देवेंद्र फडणवीस यांनी ठरवलं तर छगन भुजबळ पालकमंत्री काय तिसरे उपमुख्यमंत्री देखील होतील', असं म्हणत गिरीश महाजन यांनी छगन भुजबळ यांना खोचक टोला लगावला आहे. दरम्यान, गिरीश महाजन यांनी छगन भुजबळ यांच्यावर खोचक टीका केली.

### ठरवलं तर काही होऊ शकतं

असली तरी त्यांच्या या विधानाची राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली आहे.छगन भुजबळ यांनी मंत्रिपदाची शपथ घेतल्याच्या पार्श्वभूमीवर माध्यमांच्या प्रतिनिधींनी गिरीश महाजन यांना प्रश्न विचारला. यावर बोलताना गिरीश महाजन म्हणाले की, "बरोबर आहे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशिवाय ते शक्य होणार नाही", असं महाजन यांनी म्हटलं.तसेच छगन भुजबळ मंत्री झाले आहेत, आता ते नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदावर दावा करणार असल्याची चर्चा आहे असं विचारलं असता यावर गिरीश महाजन म्हणाले की, "चांगलं आहे, दावा करणं काय वाईट आहे? देवेंद्र फडणवीस यांनी ठरवलं तर काही होऊ शकतं. ते (छगन भुजबळ) आणखी तिसरे उपमुख्यमंत्री देखील होऊ शकतात.

# कोल्हापूरात पाऊस मंदावला

## नदीच्या पाणी पातळीत मात्र वाढ, उन्हाळ्यात पूर पर्यटन

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**कोल्हापूर जिल्ह्यात आज दिवसभर पावसाची रिपरिप सुरू होती. पावसाचे प्रमाण कमी झाले असले तरी पंचगंगा नदीच्या पाणी पातळीत एक फुटाने वाढ झाली आहे. जिल्ह्यातील बहुतेक नद्यांच्या पाणीपात्रामध्ये वाढ झाली आहे. पावसामुळे अनेक ठिकाणी पडझड झाली आहे. जिल्ह्याला गेली पाच दिवस पावसाने झोडपून काढले आहे. तुलनेने आज पावसाचे प्रमाण कमी होते. सकाळी तसेच सायंवेळी रिमझिम धारा बरसल्या. पण पावसाचे प्रमाण वाढल्याने पंचगंगा नदीची पाणी पातळी वाढत आहे.**



पंचगंगा नदी काठची मंदिरे पाण्याखाली गेली आहेत. मेच्या तिसऱ्या आठवड्यात पूरस्थिती पाहण्यासारखी परिस्थिती झाली आहे. यामुळे शनिवारच्या सुटीची संधी घेत शहरवासीयांनी नदीकाठी गर्दी केली. नदीकाठच्या भागात पाणी साठल्याने वाहनधारकांना त्यातून मार्ग काढावा लागत आहे. कोल्हापुरातील गांधी मैदानात इतक्या प्रमाणात पाणी साचले आहे की हे मैदान आहे हे सांगून पटणार नाही, अशी दुर्दशा ओढावली आहे. या प्रश्नी या मैदानात बनावट नेता फेकण्याचे आंदोलन झाले होते. त्यावर मैदानात पाणी साचणार नाही असे नियोजन कोल्हापूर महापालिकेकडून तातडीने अपेक्षित होते. आज मात्र येथील पाणी निचरा करण्याचे काम प्रशासनाने सुरू केले होते. शहराच्या अनेक भागांमध्ये पडझड झाली आहे. पावसाने अनेक भागांत झाडे कोसळलेली आहेत. अशा झाडांच्या फांद्या दूर करून वाहतूक सुरळीत करण्याचे काम सुरू होते.साताऱ्यात २४ तासांत तब्बल २४ महसूल मंडळांत ६५ मिलिमीटरपेक्षा अधिक पर्जन्यमानाची नोंद झालेली आहे, तर पावसामुळे आतापर्यंत मोठ्या सहा जनावरांसह १५० कोंबड्यांचा मृत्यू झाला आहे. तसेच, ६० घरांचेही नुकसान झालेले आहे. याशिवाय मोठ्या प्रमाणात शेतजमिनींचेही नुकसान झाले असून, त्याचा पंचनामा करण्याचे आदेश मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

### साताऱ्यात 24 मंडलांत अतिवृष्टी

कराड तालुक्यात शेतात खत टाकण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्यास तुटलेल्या वीजतारेचा धक्का बसल्याने वृद्ध शेतकरी ठार झाला. या पावसाने खटाव तालुक्यातील नेर तलाव भरून वाहू लागला आहे. त्यामुळे लगतच्या अनेक गावांतील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. मागील काही दिवसांपासून पडत असलेल्या वळवाच्या पावसामुळे यवतेश्वर, अजिंक्यतारा चार भिंती परिसरात असलेल्या डोंगरावरची माती उतारावरून खाली वाहत येत आहे. त्यामुळे साताऱ्यावरून कासला जाणारा मार्ग प्रभावित झाला आहे. दुचाकीस्वारांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. शिखर शिंगणापूरला मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने शंभू महादेवाचे मंदिर ढगांमध्ये हरवले आहे. सातारा शहरातील विसावा नाका त्यामुळे वाहनधारकांचा प्रवास सुकर झाला आहे. ठोसेघर रस्त्यावर नवीन पुलाच्या बांधकामावर ट्रक रुतल्याने ठोसेघर मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली आहे.

# मला वेश्या असल्यासारखं वाटलं!

## मिल्ला मॅगीने भारतातील स्पर्धा सोडत केले गंभीर आरोप

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**तेलंगणा येथे होणाऱ्या मिस वर्ल्ड २०२५ या स्पर्धेत भाग घेण्यासाठी आलेल्या मिस इंग्लंड २०२४ मिल्ला मॅगीने (MILLA MAGEE) अचानक स्पर्धा सोडल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. मिस इंग्लंडचा प्रतिष्ठित किताब जिंकणारी मिल्ला मॅगी हिने अचानक मिस वर्ल्ड २०२५ ही स्पर्धा सोडल्यामुळे अनेकांनी आश्चर्य व्यक्त केलं आहे. तसेच मिल्ला मॅगी हिने ही स्पर्धा अचानक सोडण्याच्या पाठिमागचं कारण ऐकून अनेकांना धक्का बसला आहे.**




मिस इंग्लंड मिल्ला मॅगीने मिस वर्ल्ड स्पर्धेतून माघार घेत ती भारतातून यूकेला परतली आहे. मात्र, पुन्हा जात असताना तिने आयोजकांवर गंभीर आरोप केले आहेत. मिल्ला मॅगी म्हटलं की, "मी तिथे काही बदल घडवून आणण्यासाठी गेले होते. मात्र, तेथे आम्हाला प्रदर्शन करणाऱ्या माकडांसारखं बसून राहावं लागलं. ते भूतकाळात अडकलेले आहेत", असे आरोप मिल्ला मॅगीने केले आहेत. या संदर्भातील वृत्त एनडीटीव्हीने दिलं आहे.भारतातील मिस वर्ल्ड २०२५ या स्पर्धेतून बाहेर पडल्यानंतर मिल्ला मॅगीने आयोजकांवर शोषणाचे आरोप केले आहेत.तसेच तिने असंही म्हटलं की, तिला हे वेश्या असल्यासारखं वाटलं. ही या स्पर्धेतून बाहेर पडल्यानंतर तिने प्रथम वैयक्तिक कारणांना दोष दिला. तसेच नंतर खुलासा करत ती या स्पर्धेतून बाहेर पडणारी पहिली मिस इंग्लंड असल्याचंही स्पष्ट केलं. दरम्यान, २०२४ ची मिस इंग्लंड मिल्ला मॅगी यामुळे आता पुन्हा एकदा सर्वत्र चर्चेत आली आहे.हैदराबादमध्ये मिस वर्ल्ड स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे. तसेच युनायटेड किंग्डमचं प्रतिनिधित्व मिल्ला मॅगीला मिळालं होतं. पण तिने आता वैयक्तिक कारणांमुळे स्पर्धा सोडण्याचा आणि आपल्या मायदेशी परतण्याचा निर्णय घेतला. तसेच मिस वर्ल्ड स्पर्धेच्या इतिहासात मिस इंग्लंडचा किताब जिंकणाऱ्या महिलेने स्पर्धा सोडण्याची ही पहिलीच वेळ असल्याचं सांगितलं जातं.स्पर्धेत भाग घेत असताना तिला कसं वागवलं गेलं? याबाबत तिने गंभीर आरोप केले.

मला वेश्या असल्यासारखं वाटलं. कारण श्रीमंत पुरुष प्रायोजकांसमोर परेड करावी लागल्याचा आरोप तिने केला आहे. तसेच आपली प्रतिष्ठा वाचावी म्हणून आपण स्पर्धा सोडण्याचा निर्णय घेतसल्याचंही तिने स्पष्ट केलं असल्याचं वृत्तात म्हटलं आहे. मिस इंग्लंड मिल्ला मॅगीने मिस वर्ल्ड स्पर्धेतून माघार घेत ती भारतातून यूकेला परतली आहे. मात्र, पुन्हा जात असताना तिने आयोजकांवर गंभीर आरोप केले आहेत. मिल्ला मॅगी म्हटलं की, "मी तिथे काही बदल घडवून आणण्यासाठी गेले होते. मात्र, तेथे आम्हाला प्रदर्शन करणाऱ्या माकडांसारखं बसून राहावं लागलं. ते भूतकाळात अडकलेले आहेत", असे आरोप मिल्ला मॅगीने केले आहेत. या संदर्भातील वृत्त एनडीटीव्हीने दिलं आहे.भारतातील मिस वर्ल्ड २०२५ या स्पर्धेतून बाहेर पडल्यानंतर मिल्ला मॅगीने आयोजकांवर शोषणाचे आरोप केले आहेत. तसेच तिने असंही म्हटलं की, तिला हे वेश्या असल्यासारखं वाटलं. ही या स्पर्धेतून बाहेर पडल्यानंतर तिने प्रथम वैयक्तिक कारणांना दोष दिला. तसेच नंतर खुलासा करत ती या स्पर्धेतून बाहेर पडणारी पहिली मिस इंग्लंड असल्याचंही स्पष्ट केलं. दरम्यान, २०२४ ची मिस इंग्लंड मिल्ला मॅगी यामुळे आता पुन्हा एकदा सर्वत्र चर्चेत आली आहे. हैदराबादमध्ये मिस वर्ल्ड स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे.

### भारत सोडून मायदेशी परतली

युनायटेड किंग्डमचं प्रतिनिधित्व मिल्ला मॅगीला मिळालं होतं. पण तिने आता वैयक्तिक कारणांमुळे स्पर्धा सोडण्याचा आणि आपल्या मायदेशी परतण्याचा निर्णय घेतला. तसेच मिस वर्ल्ड स्पर्धेच्या इतिहासात मिस इंग्लंडचा किताब जिंकणाऱ्या महिलेने स्पर्धा सोडण्याची ही पहिलीच वेळ असल्याचं सांगितलं जातं.स्पर्धेत भाग घेत असताना तिला कसं वागवलं गेलं? याबाबत तिने गंभीर आरोप केले. मला वेश्या असल्यासारखं वाटलं. कारण श्रीमंत पुरुष प्रायोजकांसमोर परेड करावी लागल्याचा आरोप तिने केला आहे. तसेच आपली प्रतिष्ठा वाचावी म्हणून आपण स्पर्धा सोडण्याचा निर्णय घेतसल्याचंही तिने स्पष्ट केलं असल्याचं वृत्तात म्हटलं आहे.

# काळजी करू नका, परिस्थिती सामान्य होईल

## राहुल गांधींचा सीमावर्ती भागातील शाळकरी विद्यार्थ्यांशी संवाद

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी सध्या जम्मू-काश्मीरच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यानिमित्त आज ते पूंछ येथे दाखल झाले आहेत. पूंछ हा प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या (एलओसी) जवळचा भाग आहे. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानमधील दहशतवाद्यांविरोधात 'ऑपरेशन सिंदूर' ही मोहीम राबवली होती. या मोहिमेनंतर पाकिस्तानी लष्कराने भारताच्या सीमेवरील गावांमध्ये गोळीबार सुरू केला. प्रामुख्याने काश्मीरच्या पूंछमधील नागरिकांना पाकिस्तानी सैन्याच्या हल्ल्याचा सामना करावा लागला.**



पाकिस्तानी लष्कराच्या हल्ल्यात पूंछमधील अनेक नागरिकांचा बळी गेला. दरम्यान, राहुल गांधी यांनी आज पाकिस्तानी लष्कराच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबियांची भेट घेतली.पूंछमधील नागरिकांना भेटल्यानंतर राहुल गांधी यांनी सर्वांना आश्वासन दिलं की "या भागातील परिस्थिती लवकरच सामान्य होईल". राहुल गांधी यांनी पूंछमधील एका शाळेला भेट दिली. सीमेपलिकडून झालेल्या गोळीबारामुळे प्रभावित झालेल्या परिसरातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. राहुल गांधी विद्यार्थ्यांना म्हणाले, "तुम्ही धोका, हल्ले आणि भयानक स्थिती पाहिली आहे. परंतु, तुम्ही काळजी करू नका. सगळं काही ठीक होईल. तुम्ही खूप अभ्यास करा, खूप खेळा, खूप मित्र बनवा, हाच या समस्येशी (दहशतवाद) सामना करण्याचा मार्ग आहे.राहुल गांधी त्यांच्या या दौऱ्यावेळी जम्मू-काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा व मुख्यमंत्री ओमर अब्दुल्लाह यांना देखील भेटणार आहेत. दरम्यान, जम्मू-काश्मीर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तारिक हमीद कर्रा राहुल गांधी यांच्या या दौऱ्याबाबत म्हणाले, "या युद्धामुळे पूंछमध्ये सर्वाधिक नुकसान झालं आहे. त्यामुळे राहुल गांधी आज पूंछमधील लोकांना भेटतील. पाकिस्तानी लष्कराच्या गोळीबारात नुकसान झालेल्या गावांना ते भेटी देतील. तिथल्या लोकांशी संवाद साधतील.

### पूंछमधील नागरिकांचं सांत्वन

जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी राहुल गांधी यांच्या दौऱ्याबाबत आधीच माहिती दिली होती. तसेच त्यांनी पीडित गावांना भेटी देणाऱ्या नेत्यांचं कौतुक केलं. ते म्हणाले, "राहुल गांधी पूंछचा दौरा करतील. ते तिथल्या लोकांना भेटतील. झालेल्या हानीबाबत त्यांच्या संवेदना व्यक्त करतील. हो एकप्रकारची मोहीम असून ती सुरू केल्याबद्दल मी तृणमूल काँग्रेसचे आभार मानतो. त्यांचे पाच सदस्य काश्मीरला आले आणि त्यांनी पीडित गावांचा दौरा केला. त्यांनी पूंछचा देखील दौरा केला. आता ते राजौरीमध्ये आहेत. उद्यापासून ते जम्मूचा दौरा करतील. ते इथे आले आणि आता ते लोकांचं म्हणणं ऐकून घेत आहेत, ही खूप चांगली गोष्ट आहे. या कठीण काळात काही लोक आमच्याबरोबर आहेत.

# प्राजक्ता माळीने नेसली ईको फ्रेंडली साडी!

मराठी सिनेसृष्टीत स्वत:च्या सौंदर्याने आणि अभिनयाने चाहत्यांच्या मनावर राज्य करणारी अभिनेत्री प्राजक्ता माळी. आणि राजकारणातील चर्चित व्यक्तिमत्व म्हणजे केंद्रिय मंत्री नितीन गडकरी. योगायोगाने या दोघांची भेट घडली. प्राजक्ता माळीने तिच्या इन्स्ट्राग्रामवर पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये तिने गडकरींसोबतच्या भेटीतील अनुभव थोडक्यात शेअर केलाय. प्राजक्ता माळी वेगवेगळ्या कारणाने कायम चर्चेत असते. सोशल मीडियावरही ती कायम अ‍ॅक्टिव्ह असते. तिच्या साड्यांची चर्चा कायम महिलांमध्ये दिसून येते. अलीकडेच तिने तिच्या इन्स्ट्राग्राम अकाउंटवर एक पोस्ट शेअर केलेली आहे. या पोस्टमध्ये तिने गडकरींसोबत झालेल्या भेटीनंतर त्यांच्याकडून भेट म्हणून मिळालेल्या साडीचा उल्लेख केलाय. नागपूरला एका कार्यक्रमानिमित्त प्राजक्ता आणि गडकरींचा एकाच मंचावर उपस्थित राहण्याचा योग काही कारणाने जुळून येता येता राहिला. त्यावेळी प्राजक्ताने कार्यक्रमाच्या आयोजकांना एक छोटीशी विनंती केली होती. ती अशी की,"सहज गडकरी साहेबांची भेट शक्य झाल्यास मला फार आवडेल." हे कळताच गडकरींनी तात्काळ प्राजक्ताला वेळ दिला. या भेटीत महाराष्ट्राच्या हास्यजत्रेतील काही पुढील कार्यक्रम, प्राजक्तराज, समृद्धी महामार्ग अशा बऱ्याच विषयांवर चर्चा झाली. यावेळी गडकरी प्राजक्ताची हास्यजत्रा बघतात हे कळल्यानं तिचा आनंद द्विगुणीत झाला. प्राजक्ताला यावेळी निघताना गडकरींनी यावेळी त्यांच्या घरातील देवीचे दर्शन घ्यायला लावले. सोबतच त्यांच्या कामावर लिहीलेली ८-९ पुस्तकं दिली. विशेष म्हणजे या भेटीत गडकरींनी प्राजक्ताला नैसर्गिक कापसापासून बनवलेली खादी साडी दिली. ही साडी प्राजक्ताने विजयादशमीच्या उत्सवातसुद्धा नेसली होती.



# तू काही माधूरी दीक्षित नाही

बॉलीवूडमध्ये ९० च्या दशकांत ज्या अभिनेत्रींनी वेगळी ओळख चाहत्यांच्या मनात तयार केली त्यात माधुरी दीक्षित आणि जुही चावलाचे नाव घ्यावे लागेल. या दोन्ही अभिनेत्रींनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य केले. माधुरीचा डान्स, अभिनय याची भुरळ अजूनही प्रेक्षकांना त्या काळाची आठवण करुन देते. आता जुही चावलानं एका मुलाखतीमधून राजा हिंदूस्थानी या चित्रपटाच्यावेळचा तो किस्सा समोर आला आहे. त्यामुळे जुही पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. सोशल मीडियावर देखील त्यारुन वेगळ्याच चर्चेला सुरुवात झाली आहे. गेल्या काही महिन्यांपासून जुही चावला ही वेगवेगळ्या कारणांमुळे बातमीचा विषय आहे. तिनं मुंबईमध्ये मोबाईल टॉवरमुळे पक्षांना होणाऱ्या त्रासाविषयी न्यायालयात धाव घेतली होती. जुहीनं त्या मुलाखतीमध्ये सांगितलं की, तिला राजा हिंदूस्थानीमध्ये प्रमुख भूमिका मिळणार होती. मात्र ती मिळाली नाही. त्यातून जुही नाराज झाली होती. प्रसिद्ध फिल्ममेकर धर्मेश दर्शन यांनी जुहीची तुलना त्यावेळी माधुरी दीक्षित सोबत केली होती. त्यामुळे जुही चर्चेतही आली होती. आता तिनं त्यावर प्रतिक्रिया दिली आहे. धर्मेश यांनी देखील आपण जुहीची तुलना माधुरी सोबत करुन तिच्या भावना दुखावल्या होत्या. जुहीला त्याचे वाईट वाटले होते. राजा हिंदुस्थानीमध्ये धर्मेश यांना जुही प्रमुख अभिनेत्री म्हणून हवी होती. मात्र ते शक्य झाले नाही. त्यावेळी त्यांनी करिश्मा कपूरशी संपर्क साधला. त्यामुळे त्यांना करिश्माकडे जावे लागले होते.

# नवऱ्याला लिपस्टिक आवडत नाही!



प्रसिद्ध अभिनेता रणबीर कपूर आणि आलिया भट्ट हे बी टाऊन कपल आता वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आले आहे. दोघेही बॉलीवूडमध्ये सर्वाधिक लाईमलाईटमध्ये असणारे कपल आहे. ब्रम्हास्त्रमध्ये त्यांनी कमाल केली होती. त्याचा दुसरा भाग पुढील वर्षी प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याची चर्चा आहे. आलियाला नुकताच सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला. गंगुबाई काठियावाडी मधील तिच्या भूमिकेनं चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले होते. त्या भूमिकेचे कौतुकही झाले होते. त्या भूमिकेसाठी परिक्षकांनी तिची राष्ट्रीय पुरस्कारानं गौरविण्यात आले आहे. दुसरीकडे काही दिवसांपूर्वी तिच्या एका प्रतिक्रियेमुळे रणबीरला नेटकऱ्यांनी ट्रोल केले आहे. रणबीरनं मला बाहेर जाताना लिपस्टिक पुसण्यास सांगितली होती. त्यामुळे मला खूप राग आला होता. आणि नवलही वाटले होते. अशी प्रतिक्रिया दिली होती. त्यावरुन रणबीरला नेटकऱ्यांनी ट्रोल केले होते. रणबीरला माझे लिपस्टिक लावणे आवडले नव्हते. रणबीरच्या अशा वागण्यानं सोशल मीडियावर वेगळ्याच चर्चेला सुरुवात झाली होती. नेटकऱ्यांनी आलियाला तुला आता रणबीरकडून वेगळी आचारसंहिता लिहून घेण्याची गरज आहे. अशा प्रकारच्या प्रतिक्रिया दिल्या होत्या. या सगळ्यात रणबीरनं त्यावर दिलेली प्रतिक्रिया चर्चेत आली आहे. आलियानं लिपस्टिक लावू नये कारण तिचा नैसर्गिकपणा रणबीरला आवडतो. रणबीर म्हणतो, मला ज्याप्रकारे बोलले जाते किंवा ट्रोल केले जाते ते चूकीचे आहे. अनेकांना मला काय महत्वाचे वाटते हे जाणून घ्यायचे नाही. झूम सेशनमधून चाहत्यांशी संवाद साधताना त्यानं त्या प्रतिक्रियेवर स्पष्टीकरण दिले आहे. मी त्या सोशल मीडियावर नाही. त्यामुळे मला त्या लोकांना प्रतिक्रिया देणं फारसं महत्वाचं वाटत नाही. मला वाटतं काही अंशी नकारात्मकता महत्वाची आहे. एक कलाकार म्हणून तुम्हाला ती मदत करते. तुम्ही त्याचा सकारात्मक विचार करणे गरजेचे आहे. कधी कधी एक सेलिब्रेटी म्हणून तुमच्याविषयी खूप काही लिहिले जाते बोलले जाते. मात्र त्या प्रत्येक गोष्टीवर तुम्ही प्रतिक्रिया देणे महत्वाचे नाही. लोकांना माझ्या कामाविषयी बोलण्याची परवानगी आहे. त्यावर त्यांची प्रतिक्रिया महत्वाची ठरते. पण म्हणून त्यांनी कोणत्याही गोष्टीवरून आम्हा कलाकारांना दोष देणे चूकीचे आहे. असेही रणबीरनं यावेळी सांगितले.

# 33 वर्षांनंतर मी पुन्हा माझ्या गुरुसोबत

मनोरंजन विश्वातील असे सुपरस्टार ज्यांनी आपल्या अभिनयाने गेली अनेक दशक प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. त्यात पहिलं नाव आहे बॉलिवूड शहंशाह अमिताभ बच्चन आणि दुसरं नाव आहे साउथस्टार रजनीकांत. दोन्ही कलाकारांच्या चाहत्यांची संख्या काही कमी नाही. चाहते त्यांच्या सिनेमांची आतुरतेने वाट पाहत असतात. तब्बल 33 वर्षांनंतर रजनीकांत आणि अमिताभ बच्चन एका सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. थलायवा रजनीकांत आणि अमिताभ बच्चन त्यांच्या आगामी 'थलाईवर 170' या चित्रपटामुळे चर्चेत आहेत. चित्रपटात दोन्ही कलाकारांची जोडी पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर येणार आहे. आता रजनीकांत यांनी अमिताभ बच्चन यांच्यासोबतचा एक फोटो सोशल मिडियावर शेअर केले आहे. या पोस्टद्वारे सुपरस्टार रजनीकांत यांनी अमिताभ यांच्यासोबत काम केल्याचा आनंद व्यक्त केला आहे. माझे हृदय आनंदाने नाचत असल्याचे त्यांनी या पोस्टमध्ये लिहिले आहे. फोटो पोस्ट करत रजनीकांत लिहितात की, '33 वर्षांनंतर मी माझे गुरु श्री अमिताभ बच्चन यांच्यासोबत टीजे ज्ञानवेल दिग्दर्शित लायकाच्या आगामी 'थलाईवर 170' या चित्रपटात पुन्हा काम करत आहे. माझे हृदय आनंदाने धडधडत आहे.' चित्रपटाच्या शूटिंगसाठी रजनीकांत मुंबईत पोहोचले आहेत. अमिताभही त्यांच्यासोबत शुट करणार आहेत. टीजे ज्ञानवेलचा हा चित्रपट एका सत्य घटनेवर आधारित



# सोनालीने गरोदरपणात मराठी गाणं केलं होतं शूट

अभिनेत्री सोनाली बेंद्रेने अनेक लोकप्रिय चित्रपटांमध्ये काम केले आहे. तिने मॉडेल म्हणून तिच्या कारकिर्दीची सुरुवात केली, त्यानंतर 'आग' (१९९४) मधून तिने अभिनयात पदार्पण केले. बॉक्स ऑफिसवर अनेक फ्लॉप चित्रपट दिल्यानंतर, तिने १९९६ मध्ये 'दिलजले'द्वारे आपली ओळख निर्माण केली. सोनालीने २००४ मध्ये 'अगं बाई अरेच्चा' या मराठी चित्रपटात 'छम छम करता' हे आयटम साँग केले होते. २००४ मध्ये आलेल्या 'अगं बाई अरेच्चा' या मराठी चित्रपटातील 'छम छम करता' या गाण्याच्या शूटिंगदरम्यान ती गर्भवती असल्याची माहिती तिला नव्हती, असे बॉलीवूड अभिनेत्री सोनाली बेंद्रेने सांगितले. सोनाली बेंद्रेने डान्स कोरिओग्राफर फराह खानशी झालेल्या संभाषणात याबद्दल सांगितले. फराह खान सध्या वेगवेगळ्या सेलिब्रिटींबरोबर व्लॉगिंग करीत आहे आणि ती सोनाली बेंद्रेबरोबर काश्मिरी गुच्ची पुलाव बनवत असताना तिने ही माहिती दिली. फराह खान म्हणाली, "सोनाली, आपण एकत्र अनेक गाणी केली आहेत. आम्ही 'आँखों में बसे हो तुम', नंतर 'डुप्लिकेट' आणि नंतर 'छम छम करता' हे मराठी गाणे केले." त्याच संभाषणादरम्यान सोनाली बेंद्रे म्हणाली, "जेव्हा मी त्या गाण्याचे शूटिंग करत होते तेव्हा मला माहीत नव्हते की, मी गर्भवती आहे." फराह खानने सोनाली बेंद्रेचे कौतुक केले.यादरम्यान, फराह खानने सांगितले की, त्यावेळी सोनाली जाड होती आणि ती एखाद्या चित्रपटातील नायिकेसारखी दिसत होती.

# ब्रूकने घेतला अविश्वसनीय कॅच!

## इंग्लंडने 565 धावांचा डोंगर उभारला आणि डाव घोषित केला

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**इंग्लंड आणि झिम्बाब्वे या दोन्ही संघांमध्ये ४ दिवसीय कसोटी सामना पार पडला. या सामन्यात इंग्लंडने आपलं वर्चस्व कायम राखत झिम्बाब्वेवर १ डाव आणि ४५ धावांनी विजय मिळवला आहे. इंग्लंडने हा सामना तिसऱ्याच दिवशी आपल्या नावावर केला. या सामन्यात इंग्लंडच्या हॅरी ब्रूकने स्लिपमध्ये क्षेत्ररक्षण करताना अविश्वसनीय झेल घेतला, ज्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.**




या सामन्यात इंग्लंडचा संघ नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानावर आला. इंग्लंडने आपला पहिला डाव ६ गडी बाद ५६५ धावांवर घोषित केला. इंग्लंडकडून जॅक क्रॉलीने सलामीला फलंदाजी करताना १२४ धावा केल्या. तर बेन डकेटने १४० धावांची खेळी केली. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना ओली पोपने १७१ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर इंग्लंडने ५६५ धावांचा डोंगर उभारला आणि डाव घोषित केला.झिम्बाब्वेकडून पहिल्या डावात सलामीला फलंदाजी करताना ब्रायन बेनेटने १३९ धावांची खेळी केली. कर्णधार क्रेग एर्विनने ४२ धावांची खेळी केली. तर सीन विल्यम्सने २५ धावांची खेळी केली. झिम्बाब्वेचा पहिला डाव २६५ धावांवर आटोपला. इंग्लंडने झिम्बाब्वेला फॉलोऑन दिला.झिम्बाब्वेला दुसऱ्या डावात फॉलोऑन मिळाला. दुसऱ्या डावात झिम्बाब्वेकडून सिन विल्यम्सने सर्वाधिक ८८ धावांची खेळी केली. या डावात क्षेत्ररक्षण करत असताना हॅरी ब्रूकने वेस्ली माझेव्हेरेचा भन्नाट झेल घेतला. तर झाले असे की, इंग्लंडकडून ४८ वे षटक टाकण्यासाठी बेन स्टोक्स गोलंदाजीला आला. या षटकातील चौथ्या चेंडूवर ऑफ साईडच्या दिशेने कट करण्याचा प्रयत्न केला. पण, चेंडू बॅटची कडा घेत, स्लिपमध्ये असलेल्या हॅरी ब्रूकच्या हातात गेला. ब्रूकने उडी मारून उजव्या हाताने शानदार झेल घेतला. हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.या सामन्यानंतर भारतीय संघासमोर भारतीय संघाचं आव्हान असणार आहे. भारतीय संघ कसोटी मालिकेसाठी इंग्लंड दौऱ्यावर येणार आहे. दोन्ही संघांमध्ये २० जूनपासून ५ कसोटी सामन्यांच्या मालिकेला सुरूवात होणार आहे. या मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. या संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी शुबमन गिलकडे सोपवण्यात आली आहे.या सामन्यात इंग्लंडचा संघ नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानावर आला. इंग्लंडने आपला पहिला डाव ६ गडी बाद ५६५ धावांवर घोषित केला. इंग्लंडकडून जॅक क्रॉलीने सलामीला फलंदाजी करताना १२४ धावा केल्या. तर बेन डकेटने १४० धावांची खेळी केली. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना ओली पोपने १७१ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर इंग्लंडने ५६५ धावांचा डोंगर उभारला आणि डाव घोषित केला.झिम्बाब्वेकडून पहिल्या डावात सलामीला फलंदाजी करताना ब्रायन बेनेटने १३९ धावांची खेळी केली. कर्णधार क्रेग एर्विनने ४२ धावांची खेळी केली. तर सीन विल्यम्सने २५ धावांची खेळी केली.

### हॅरी ब्रूकने घेतला भन्नाट कॅच

झिम्बाब्वेचा पहिला डाव २६५ धावांवर आटोपला. इंग्लंडने झिम्बाब्वेला फॉलोऑन दिला.झिम्बाब्वेला दुसऱ्या डावात फॉलोऑन मिळाला. दुसऱ्या डावात झिम्बाब्वेकडून सिन विल्यम्सने सर्वाधिक ८८ धावांची खेळी केली. या डावात क्षेत्ररक्षण करत असताना हॅरी ब्रूकने वेस्ली माझेव्हेरेचा भन्नाट झेल घेतला. तर झाले असे की, इंग्लंडकडून ४८ वे षटक टाकण्यासाठी बेन स्टोक्स गोलंदाजीला आला. या षटकातील चौथ्या चेंडूवर ऑफ साईडच्या दिशेने कट करण्याचा प्रयत्न केला. पण, चेंडू बॅटची कडा घेत, स्लिपमध्ये असलेल्या हॅरी ब्रूकच्या हातात गेला. ब्रूकने उडी मारून उजव्या हाताने शानदार झेल घेतला. हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.या सामन्यानंतर भारतीय संघासमोर भारतीय संघाचं आव्हान असणार आहे. भारतीय संघ कसोटी मालिकेसाठी इंग्लंड दौऱ्यावर येणार आहे. दोन्ही संघांमध्ये २० जूनपासून ५ कसोटी सामन्यांच्या मालिकेला सुरूवात होणार आहे.

---

# धावांचा पाऊस पाडला, वजन कमी केलं

## तरीही सरफराज खानची इंग्लंडची फ्लाईट हुकली

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**भारतीय क्रिकेट नियामक मंडळ ( बीसीसीआयने) इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय कसोटी संघाची घोषणा केली आहे. या दोन्ही संघांमध्ये २० जूनपासून ५ कसोटी सामन्यांच्या मालिकेला सुरूवात होणार आहे. मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनी पत्रकार परिषद घेत भारतीय संघाची घोषणा केली आहे.**



या दौऱ्यासाठी नव्या भारतीय कर्णधाराची घोषणा करण्यात आली आहे. शुबमन गिल या दौऱ्यावर भारतीय संघाचं नेतृत्व करताना दिसून येणार आहे. या दौऱ्यासाठी युवा भारतीय खेळाडूंना संधी देण्यात आली आहे. तर सरफराज खानला या दौऱ्यासाठी संघात भारतीय संघात स्थान देण्यात आलेलं नाही. देशांतर्गत क्रिकेटमध्ये धावांचा पाऊस पाडणाऱ्या सरफराज खानला इंग्लंडविरुद्ध झालेल्या कसोटी मालिकेत पदार्पण करण्याची संधी मिळाली होती. या मालिकेत त्याने धावांचा पाऊस पाडला. त्यानंतर आयपीएल २०२५ स्पर्धेसाठी झालेल्या लिलावात तो अन्सोल्ड राहिला. या वेळेचा त्याने पुरेपूर वापर केला आणि आपल्या फिटनेसकडे लक्ष दिलं. काही दिवसांपूर्वीच त्याने एक फोटो शेअर केला होता, ज्यात तो फिट असल्याचं दिसून आलं. सरफराजने इंग्लंड दौऱ्याची तयारी म्हणून १० किलो वजन कमी केलं. यासह दिवसाला ५०० ते ६०० स्विंग होणारे चेंडू खेळून काढले. मात्र, तरीदेखील इंग्लंड दौऱ्यासाठी त्याचा भारतीय संघात समावेश करण्यात आलेलं नाही. सरफराज खानने इंग्लंडविरुद्ध झालेल्या मालिकेत मधल्या फळीत फलंदाजी करताना दमदार कामगिरी केली होती. त्यानंतर न्यूझीलंडविरुद्ध खेळताना त्याची बॅट शांत राहिली. त्यामुळे ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर त्याला खेळण्याची संधी मिळाली नाही. त्यानंतर आयपीएल २०२५ स्पर्धेत अन्सोल्ड राहिल्याने त्याने आपलं संपूर्ण लक्ष फिटनेसवर केंद्रीत केलं.इंग्लंड दौऱ्यावर मधल्या फळीत विराट कोहलीसारखा अनुभवी खेळाडू नसणार आहे. त्यामुळे भारतीय संघाला चौथ्या क्रमांकावर खेळण्यासाठी अनुभवी फलंदाजाची गरज भासणार आहे. त्यामुळे करुण नायर आणि केएल राहुलसारख्या खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे.या दौऱ्यासाठी नव्या भारतीय कर्णधाराची घोषणा करण्यात आली आहे.

### अनुभवी फलंदाजाची गरज

दौऱ्यासाठी युवा भारतीय खेळाडूंना संधी देण्यात आली आहे. तर सरफराज खानला या दौऱ्यासाठी संघात भारतीय संघात स्थान देण्यात आलेलं नाही. देशांतर्गत क्रिकेटमध्ये धावांचा पाऊस पाडणाऱ्या सरफराज खानला इंग्लंडविरुद्ध झालेल्या कसोटी मालिकेत पदार्पण करण्याची संधी मिळाली होती.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

। रविवार ।

। दि. 25 मे 2025।



KAMALA Education Society

KAMALA EDUCATION SOCIETY'S

## PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

## ADMISSIONS OPEN

Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)

**BBA**



**Bachelor of Business Administration**

**BCA**



**Bachelor of Computer Applications**

### Highlights:

- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**

**BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more


MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
7
STAR
RANKING
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JR. COLLEGE
WE MAKE YOUR FUTURE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
ADMISSION
OPEN
2025-2026
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
• Computer Science
• Crop Science
• Electronics
• Mechanical / Technical Automobile
• Information Technology (IT)
For Commerce Stream
• Banking
• Marketing & Sales
• Office Management
• Small Industries & Self employment
• Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241